# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# विद्यार्थी विकास मंडळ

# शैक्षणिक वर्ष २०१९—२० अहवाल

(जुलै २०१९ ते जून २०२०)

०१) **विद्यार्थी परिषद निवडणूक :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९९ च्या पोटकलम (१) मध्ये विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी विविध विद्यार्थी संघांच्या पाठयेतर कार्यक्रमाचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, विद्यापीठाच्या विभागाकरिता एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालय किंवा परिसंस्था आणि प्रत्येक संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता एक महाविद्यालय विद्यार्थी परिषद घटीत करण्याची तरतूद आहे, आणि म्हणून उक्त परिषदेच्या निवडणूका घेण्याची रीतीची तरतूद केली आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थां, विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांकरिता विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात आला.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम. २०१६ (सन २०१७ चा महा.६) याच्या कलम ९९ ख च्या पोट—कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने याद्वारे, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका पुढे ढकलण्यात आल्या.

०२) **कोल्हापूर व सांगली पूरग्रस्तठिकाणी आपत्ती निवारण शिबिर.**

अतिवर्षण व पूरग्रस्त परिस्थितीमुळे कोल्हापूर व सांगली मधील बहुतांश भागात जनजीवन अत्यंत विस्कळीत झाले आहे. नैसर्गिक व मानवी मालमत्तेची अपरिमित हानी झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. नितीन करमळकर यांच्या निर्देशनुसार दिनांक १७ व १८ ऑगस्ट, २०१९ रोजी व्यवस्थापन परिषदेचे काही सदस्य व प्रत्यक्ष शिबिरात काम करणाऱ्या महाविद्यालयांनी काही शिक्षकांनी प्रत्यक्ष जाऊन तेथील लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी व पूरग्रस्त नागरीकांची भेट घेतली. कोल्हापूर व सांगली जिल्हयातील दोन्ही मिळून चौदा पूरग्रस्त गावांमध्ये दि. २२ ते २८ ऑगस्ट अशा सात दिवस आपत्ती निवारण शिबिर घेऊन स्वच्छता, मानसिक आधार आणि आपत्ती व्यवस्थापनाबद्दल प्रबोधन केले गेले. ह्या शिबिरामध्ये ५०० विद्यार्थी आणि २३ प्राध्यापक सहभागी झाले होते. यामध्ये ३११ घरांची डागडुजी, १३ शाळाची स्वच्छता व नालेसफाई, ७८३७ घरांचे सर्वेक्षण व एकूण ३९१८५ व्यक्तींशी संवाद साधला.

०३) **विभागीय युवक महोत्सव :**

शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता विद्यार्थी विकास मंडळामार्फत जिल्हानिहाय/विभागवार आयोजित करण्यात येतो. या युवक महोत्सवाच्या निवड चाचणीसाठी प्रत्येक विभागातून/जिल्हयांतून अंदाजे ५०० ते ७०० विद्यार्थी उपस्थित राहिले. या शैक्षणिक वर्षात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांतील विद्यार्थ्यांकरिता जिल्हानिहाय/विभागवार युवक महोत्सवाचे पुढील प्रमाणे आयोजन करण्यात आले होते.

| विभाग/जिल्हा | स्पर्धेचा दिनांक |
|---|---|
| अहमदनगर | **गुरूवार, दि. १० ऑक्टोबर, २०१९** |
| नाशिक | **शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबर, २०१९** |
| पुणे जिल्हा | **रविवार, दि. १३ ऑक्टोबर, २०१९** |
| | **सोमवार, दि. १४ ऑक्टोबर, २०१९** |
| | **मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर, २०१९** |

०४) **विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव निवड चाचणी :**

शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता युवक महोत्सव विद्यापीठ संघ निवडीकरिता संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव निवड चाचणीचे आयोजन दि. ०५ व ०६ नोव्हेंबर, २०१९ रोजी करण्यात आले होते.

या विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव निवड चाचणीकरीता दि. १० ते १५ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत घेण्यात आलेल्या विभागीय युवक महोत्सव निवड चाचणीतून निवडण्यात आलेले अहमदनगर, नाशिक व पुणे ग्रामीण, पुणे शहर या विभागातील निवडक ८०० विद्यार्थी उपस्थित होते.

०५) **इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवक महोत्सव :**

माननीय राज्यपाल तथा मा. कुलपती यांचे आदेशान्वये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक ०२ ते ०६ डिसेंबर, २०१९ येथे या कालावधीत 'इंद्रधनुष्य–२०१९' या राज्यस्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन झाले. या युवक महोत्सवासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ४० जणांचा संघ सहभागी झाले. या युवक महोत्सवामध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी व अकृषी विद्यापीठांनी सहभाग नोंदविला. या युवक महोत्सवात ८०० विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला प्रकारांचे सादरीकरण केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या २३ विद्यार्थ्यांनी १६ कलाप्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढीलप्रमाणे १६ कला प्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले. राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवात यंदा प्रथमच विद्यापीठाने उपविजेतेपदास गवसणी घातली.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कलाप्रकाराचे नाव | मिळालेला क्रमांक | अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कलाप्रकाराचे नाव | मिळालेला क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हर्षद गोळेसर | समूहगीत | प्रथम | २१ | प्रशांत मखरे | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| २ | शीतल गर्दे | समूहगीत | प्रथम | २२ | ज्ञानेश्वर खरात | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ३ | आफताब शेख | समूहगीत | प्रथम | २३ | अंकिता शिवतरे | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ४ | अभयसिंह वाघचौरे | समूहगीत | प्रथम | २४ | प्रणव कोंटूरवार | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ५ | किरण नायक | समूहगीत | प्रथम | २५ | सिद्धेश्वर उंडाळकर | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ६ | हर्षद गोळेसर | सुगम गायन | प्रथम | २६ | रोहित नागरे | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ७ | शिवानी मराठे | मातीकाम | प्रथम | २७ | हर्षद गोळेसर | लोकवाद्यवृंद | तृतीय |
| ८ | गौरव पाटील | स्थळचित्रण | प्रथम | २८ | प्रशांत मखरे | एकांकिका | तृतीय |
| ९ | गौरव पाटील | भित्तीचित्र | द्वितीय | २९ | प्रतिक विसपुते | एकांकिका | तृतीय |
| १० | सुमेध वाघमारे | नकला | द्वितीय | ३० | भक्ती देशमुख | एकांकिका | तृतीय |
| ११ | सिद्धेश्वर उंडाळकर | शास्त्रीय तालवाद्य | द्वितीय | ३१ | मयुरी कुचेकर | लघुनाटिका | तृतीय |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | भक्ती देशमुख | वादविवाद | द्वितीय | ३२ | आकांक्षा वळे | लघुनाटिका | तृतीय |
| १३ | अवधुत पाटील | वादविवाद | द्वितीय | ३३ | प्रशांत मखरे | लघुनाटिका | तृतीय |
| १४ | भक्ती देशमुख | वक्तृत्त्व | तृतीय | ३४ | भक्ती देशमुख | लघुनाटिका | तृतीय |
| १५ | ऋषिकेश शिंदे | प्रश्न मंजुषा | तृतीय | ३५ | प्रतिक विसपुते | लघुनाटिका | तृतीय |
| १६ | अवधुत पाटील | प्रश्न मंजुषा | तृतीय | ३६ | अभिषेक मेहरूणकर | व्यंगचित्र | तृतीय |
| १७ | भक्ती देशमुख | प्रश्न मंजुषा | तृतीय | ३७ | ऋषिता आरूडकर | पाश्चात्य एकल गायन | तृतीय |
| १८ | अभयसिंह वाघचौरे | शास्त्रीय गायन | तृतीय | | | | |
| १९ | विजय कापसे | लोकवाद्यवृंद | तृतीय | | | | |
| २० | धीरज खोत | लोकवाद्यवृंद | तृतीय | | | | |
| सर्वसाधारण उपविजेतेपद | | | | | | | |

### ०६) पश्चिम विभागीय युवक महोत्सव :

भारतीय विश्वविद्यालय महासंघ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवास्पंदन' हा ३५ वा आंतरविद्यापीठीय पश्चिम विभाग युवकमहोत्सव दिनांक २७ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत ऊका तरसाडिया विद्यापीठ, बार्डोली, गुजरात येथे आयोजित करण्यात आला. या युवक महोत्सवासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ४० जणांचा संघ सहभागी झाला. या युवक महोत्सवात ललित कला विभागाचे सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १८ विद्यार्थ्यांनी ०९ कलाप्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने खालीलप्रमाणे ०९ कला प्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कलाप्रकाराचे नाव | प्राप्त पुरस्कार |
|---|---|---|---|
| ०१ | हर्षद गोळेसर | समूहगीत | द्वितीय |
| ०२ | हर्षद गोळेसर | सुगम गायन | प्रथम |
| ०३ | हर्षद गोळेसर | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| ०४ | आफताब शेख | समूहगीत | द्वितीय |
| ०४ | अभयसिंह वाघचौरे | समूहगीत | द्वितीय |
| ०५ | किरण नायक | समूहगीत | द्वितीय |
| ०६ | शीतल गर्दे | समूहगीत | द्वितीय |
| ०७ | श्रुती बोरसे | समूहगीत | द्वितीय |
| ०८ | सिद्धेश्वर उंडाळकर | शास्त्रीय तालवाद्य | प्रथम |
| ०९ | गौरव पाटील | स्थळचित्रण | प्रथम |
| १० | गौरव पाटील | भित्तीचित्र | तृतीय |
| ११ | अभिषेक मेहरूणकर | कातरकाम | द्वितीय |
| १२ | अभिषेक मेहरूणकर | व्यंगचित्र | द्वितीय |
| १३ | विजय कापसे | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १४ | धीरज खोत | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १५ | प्रशांत मखरे | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १६ | ज्ञानेश्वर खरात | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १७ | अंकिता शिवतरे | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १८ | प्रणव कोंटूरवार | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| १९ | तपन बेडसे | लोकवाद्यवृंद | द्वितीय |
| २० | रोहित नागरे | लोकवाद्यवृंद | द्वितीय |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | विश्वेश्वरय्या स्वामी | नकला | तृतीय |
| २२ | ललितकला सर्वसाधारण विजेतेपद | | |
| २३ | सर्वसाधारण विजेतेपद तृतीय क्रमांक | | |

०७) **राष्ट्रीय युवक महोत्सव :**

भारतीय विश्वविद्यालय महासंघ, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने ३५ वा राष्ट्रीय युवक महोत्सवाचे आयोजन दिनांक ३ ते ८ फेब्रुवारी, २०२० रोजी ॲमिटी विद्यापीठ, नोएडा, राष्ट्रीय राजधानी परिसर या ठिकाणी करण्यात आलेले होते. विभागीय युवक महोत्सवामध्ये जे स्पर्धक प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने विजयी झालेले आहेत. त्यांनाच राष्ट्रीय यवुक महोत्सवात सहभाग घेता येतो. सदर निकषान्वये या युवक महोत्सवासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २५ जणांचा संघ सहभागी झाला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १५ विद्यार्थ्यांनी ०५ कलाप्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढीलप्रमाणे १६ कला प्रकारांमध्ये विजेतेपद प्राप्त केले. या युवक महोत्सवामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघास खालील प्रमाणे पुरस्कार प्राप्त झाले.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कलाप्रकाराचे नाव | प्राप्त पुरस्कार |
|---|---|---|---|
| ०१ | सिद्धेश्वर उंडाळकर | शास्त्रीय तालवाद्य | प्रथम |
| ०२ | हर्षद गोळेसर | समूहगीत | द्वितीय |
| ०३ | अभयसिंह वाघचौरे | समूहगीत | द्वितीय |
| ०४ | आफताब शेख | समूहगीत | द्वितीय |
| ०५ | रोहित नागरे | समूहगीत | द्वितीय |
| ०६ | किरण नायक | समूहगीत | द्वितीय |
| ०७ | श्रुती बोरसे | समूहगीत | द्वितीय |
| ०८ | शीतल गर्दे | समूहगीत | द्वितीय |
| ०९ | गौरव पाटील | भित्तीचित्र | द्वितीय |
| १० | गौरव पाटील | स्थळचित्रण | चतुर्थ |
| ११ | हर्षद गोळेसर | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १२ | विजय कापसे | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १३ | सिद्धेश्वर उंडाळकर | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १४ | रोहित नागरे | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १५ | ज्ञानेश्वर खरात | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १६ | धीरज खोत | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १७ | प्रणव कोंटूरवार | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १८ | प्रशांत मखरे | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |
| १९ | अंकिता शिवतरे | लोकवाद्यवृंद | चतुर्थ |

०८) **नव उद्योजक/मी उद्योजक या स्पर्धेचे आयोजन :**

परिसरात उपलब्ध होणारा कच्चा माल कृषी उत्पादन/उत्पन्न, जल, ऊर्जा यासारखे अन्य स्त्रोत, एकदा वापरून पुन्हा त्याच कामासाठी न वापरता येणाऱ्या, निरुपयोगी अथवा टाकाऊ वस्तू, इत्यादींच्या सहाय्याने नवनिर्मिती करावी; उपलब्ध किमान साधने व संसाधनांचा जास्तीत जास्त वापर तथा पुनर्वापर करून पर्यावरण–स्नेही उत्पादन करण्याचा प्रयत्न करून हस्तकला, लघुउद्योग, गृहउद्योग,कुटिरोद्योग, कौशल्याधारित उद्योग तसेच शिवणकला, पाककला, सेवाउद्यम, संसाधन व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगशीलता, नवनिर्मिती यांच्या माध्यमातून उद्यमशीलता निर्माण व्हावी, वाढीस लागावी

ज्यायोगे भविष्यात त्यांना व्यावसायिक जीवनात मार्गक्रमण करण्यास सुलभ जावे, या हेतूने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ परिसरातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभागांतून प्रवेशित विद्यार्थ्यांचे अंगभूत कौशल्य, गुणविशेष लक्षात घेता त्यांच्यातील उद्यमशीलता, उद्योजकता व नवनिर्मितीला चालना मिळावी म्हणून प्रत्येक महाविद्यालय/ परिसंस्था/विभागात 'नव उद्योजक/मी उद्योजक' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

०९) **राज्यस्तरीय विविध प्रयोगजीवी कला, लोककला व युवा साहित्य महोत्सव :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ परिसरातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभागांतून प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता राज्यस्तरीय, विविध लोककला व युवा महोत्सवाचे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२० मध्ये पुढीलप्रमाणे जिल्हावार आयोजन करण्यात आले होते.

| विभाग/जिल्हा | महोत्सव |
|---|---|
| पुणे | स्वरमाधुरी राज्यस्तरीय भारतीय व पाश्चात्य संगीत महोत्सव<br>(शास्त्रीय व सुगम गायन वाद्य वादन) |
| अहमदनगर | राज्यस्तरीय नाटय महोत्सव<br>(एकांकिका, नाटयछटा, प्रहसन, मूकनाटय, नकला) |
| नाशिक | राज्यस्तरीय युवा साहित्य महोत्सव २०२०<br>(वादविवाद, वक्तृत्त्व काव्यवाचन, प्रश्नमंजुषा) |
| | राज्यस्तरीय लोक कला महोत्सव |

यामध्ये राज्यातील ५००० हून अधिक कलाकार विद्यार्थी सहभागी झाले होते.

१०) **विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष स्थापना** :

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६ (२)(ख) नुसार विद्यार्थ्याच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी आणि त्यास अटकाव करण्यासाठी निरनिराळे मार्ग व साधने उच्चतर प्राधिकरणांना सुचविण्यासाठी विद्यापीठामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष असेल, असे निर्देशित केले आहे. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाजविषयक कार्यकारी यंत्रणा ही, विद्यापीठ अनुदान आयोग (तक्रार निवारण) विनियम, २०१२ किंवा त्या त्या वेळी अंमलात असेलेले इतर कोणतेही विनियम यांच्या तरतुदींनुसार तयार केलेल्या परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल, असे नमूद केले आहे. त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ५ (४) अन्वये मा. कुलगुरू यांनी डॉ. एन. एस. उमराणी, मा. प्र–कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष घटित केला आहे. विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष पुढील सदस्यांनी मिळून बनलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. एन.एस. उमराणी, प्र-कुलगुरू | : | अध्यक्ष |
| २. | प्राचार्य डॉ. दिनेश नाईक | : | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. संजय खरात | : | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. स्नेहल अग्निहोत्री | : | सदस्य |
| ५. | श्री. अनिल एकनाथ विखे | : | सदस्य |
| ६. | संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | : | सदस्य–सचिव. |

११) **संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष स्थापना** :

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६ (२)(ख) नुसार विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी आणि त्यास अटकाव करण्यासाठी निरनिराळे मार्ग व साधने उच्चतर प्राधिकरणांना सुचविण्यासाठी विद्यापीठामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष असेल, असे निर्देशित केले आहे. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाजविषयक कार्यकारी यंत्रणा ही, विद्यापीठ अनुदान आयोग (तक्रार निवारण) विनियम, २०१२ किंवा त्या त्या वेळी अंमलात असेलेले इतर कोणतेही विनियम यांच्या तरतुदींनुसार तयार केलेल्या परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल, असे नमूद केले आहे. त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि सन २०१९ चा एकरूप परिनियम ५ मधील कलम ५(२) अन्वये मा. कुलगुरू यांनी डॉ. एन. एस. उमराणी, मा. प्र–कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष घटित घटित केला आहे. संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष पुढील सदस्यांनी मिळून बनलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. एन.एस. उमराणी, प्र-कुलगुरू | : | अध्यक्ष |
| २. | डॉ. दुर्गाम्बिनी पटेल | : | सदस्य |
| ३. | डॉ. मनोहर जाधव | : | सदस्य |
| ४. | श्री. विश्वनाथ पाडवी | : | सदस्य |
| ५. | संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | : | सदस्य–सचिव. |

१२) **आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिवस** :

दिनांक ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयांमध्ये विविध सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने क्रीडा, साहित्य, नाटय, संगीत, नृत्य श प्रमुख स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धांमध्ये दिव्यांग विद्यार्थी–शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

१३) **रॅगिंग संनियंत्रण कक्ष** :

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये रॅगिंग प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने 'महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा, १९९९' लागू केला आहे. रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापक स्वरुपात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली रॅगिंग सनियंत्रण कक्ष कार्यरत आहे.

१४) **शैक्षणिक कर्ज योजना** :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात विविध व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रम अनुदानित व विनाअनुदानित तत्त्वावर राबविले जातात. गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विद्यापीठाकडून माफक व्याजदराने शैक्षणिक कर्ज प्राप्त करून देण्यासाठी विद्यापीठाकडून 'सहाय्यभूत व्यवस्था' निर्माण करून शैक्षणिक कर्ज योजना लागू करण्याकरिता आणि त्याबाबतची तरतूद व त्याचे निकष ठरवण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्देशानुसार मा. श्री. राजेश पांडे, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित करण्यात आली आहे.

---